मा.कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** इतवारा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0285 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख़. दिनांक आणि वेळ):** 03/09/2023 03:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 02/09/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/09/2023

**Time From (वेळेपासून):** 12:34 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/09/2023 **Time (वेळ):** 03:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/09/2023 03:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** व्हाइट हाउस सार्वजनीक रोड, देगलूर नाका नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मिरजा रहेमतउल्ला बेग मिरजा महम्म्द बेग

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : मिरजा महम्म्द बेग

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अरब गल्ली ,इतवारा नांदेड ,इतवारा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अरब गल्ली ,इतवारा नांदेड ,इतवारा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9767777539

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गिरीश चिंताहरी काठीकर | | वडील का नाम : चिंताहरी काठीकर | 1. बाबा नगर नांदेड ,नांदेड , इतवारा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मिरजा अफजल बेग मिरजा शमशोद्दीन बेग | | वडील का नाम : मिरजा शमशोद्दीन बेग | 1. गूलजार बाग नांदेड ,इतवारा, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराचे 40 नोटा | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 03/09/2023

फिर्याद

मी मिर्झा रहेमतउल्ला बेग पिता मिर्झा महम्म्द बेग, वय 44 वर्ष, व्यवसाय कापड दुकान, रा. अरब गल्ली, दरबार मस्जिद जवळ, होळी ता. जि. नांदेड, मो.क्र 9767777539.

समक्ष पोलीस स्टेशन इतवारा नांदेड येथे हजर येवून लेखी फिर्याद लिहून देतो की, मी वर नमुद ठिकाणी राहणारा असून किड्स वेअर कापडाचे दुकान चालवून माझे कुटूबाचा उदरनिर्वाह करतो. दिनांक 31/08/2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे जावून तक्रार दिली ती खालील प्रमाणे

माझ्या स्वतःच्या व भावाच्या मालकीच्या जागेत टिन शेडचे काम करून सदर टिनशेड मध्ये कापड दुकान चालवत आहे. दिनांक 27/08/2023 रोजी श्री. राखेवार, बिल कलेक्टर, महानगर पालिका नांदेड यांनी मला फोनद्वारे कळविले की, तुमच्या बांधकामाची मोजणी करायची आहे, तुम्हीं या, असे सांगितले. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, मी बाहेर असून थोडया वेळाने आपल्याजवळ येतो. त्यानंतर मी माझ्या घरी आलो असता मला समजले की, श्री. राखेवार यांनी माझ्या टिन शेडच्या बांधकामाची मोजणी करून गेले आहेत. त्यावेळी मी श्री राखेवार यांना फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, दिनांक 28/08/2023 रोजी त्यांचे कार्यालय महात्मा गांधी पुतळयाजवळ नांदेड येथे येवून भेटा असे सांगितले.

दिनांक 28/08/2023 रोजी मी श्री राखेवार यांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली असता त्यांनी मला श्री काठीकर साहेब यांची भेट घ्या असे सांगितल्याने मी श्री काठीकर साहेब यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेतली असता त्यांनी मला सांगितले की, तुमचे घराचे टिन शेड उभारण्याच्या कामाची महानगर पालीका नांदेड यांची कोणतीही पुर्व परवानगी न घेता आपण चोरून बांधकाम केल्यामुळे सदर बांधकाम हे पाडून टाकून आपणांस दिड लाख रूपये दंड लागेल असे सांगितले. त्यावर मी श्री काठीकर साहेबांना विनंती केली की, माझे बांधकाम पाडू नका, वाटल्यास मला टॅक्स वाढवा पण बांधकाम पाडू नका असे सांगितले. तेव्हा श्री काठीकर साहेब यांनी मला सांगितले की, सदर कामाचे मला वेगळे 20,000/- रूपये द्यावे लागतील असे म्हणून माझेकडे लाचेची मागणी केली होती. त्यावरून मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयात वर प्रमाणे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषगांने श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कार्यालयातील पोलीस निरीक्षक श्री अरविंद हिंगोले यांचेकडे हजर असलेले दोन शासकीय पंच यांना त्यांचे कक्षात बोलून घेवून त्यांना माझा व सापळा पथकातील सर्व सदस्य यांचा एकमेकांचा परिचय करून दिला. मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचेकडे मी दिनांक 31/08/2023 रोजी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी लेखी तक्रार पुर्ण वाचून मी दिलेली लेखी तक्रार व तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड बाबत थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील सदस्य पोकॉ खदिर यांनी पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे, माझे व दोन्ही पंचांचे परिचयदर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी मी केलेल्या तक्रारी अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कामी लोकसेवक श्री काठीकर यांचे कार्यालय पाणी पुरवठा विभाग झोन क्रमांक 4 महानगर पालीका नांदेड येथे त्यांची भेट घेण्यासाठी पाठवुन लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला लाच मागणी पडताळणी कार्यवाही अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर सापळा पथकातील सदस्य यांनी पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचनेवरून माझे गळयात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून दोरीच्या साहाय्याने लटकवून दिले. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 श्री विक्की यन्नम असे दोघांना मोटार

सायकलने लोकसेवक श्री काठीकर यांची भेट घेणेकामी ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून वेळ 14.51 वा. रवाना केले.

मी व पंच क्रमांक 1 असे कार्यालय पाणी पुरवठा विभाग झोन क्रमांक 4 महानगर पालीका नांदेड येथे जावून श्री राखेवार, बिल कलेक्टर यांना माझे मोबाईल वरून फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, मी सध्या कार्यालयात नसून घरी आहे, तुम्ही श्री काठीकर साहेब यांना भेटा. तेव्हा मी श्री राखेवार यांना म्हणालो की, तुम्ही श्री काठीकर साहेब यांना फोन करून माझे कामासंबंधाने सांगणे बाबत विनंती केली. त्यानंतर मी श्री काठीकर साहेब यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितले की, तुमच्या कामा संबंधाने राखेवार यांचा फोन आला होता. "अफजल को बात हुई थी ना उस दिन, बोल दिया अफजल को मै, अरे दुसरो कु कैकू इधर जारे तुमारेकु तुम उसके पास इसके पास गए तो कुछ भी काम नही होता असे म्हणून मी सध्या मिटींगकामी जात आहे तुम्ही उद्या या असे सांगितले. त्यामुळे मी माझे कामासंबंधाने अफजल यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो.

त्यानंतर दिनांक 01/09/2023 रोजी ठरलेल्या प्रमाणे मी व दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य हे ला. प्र.वि. कार्यालय नांदेड येथे 10.00 वा. हजर आलो. त्यावेळी पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी सांगितले की, लोकसेवक श्री काठीकर यांची त्यांचे कार्यालय येथे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असून मला व पंच क्रमांक 1 यांना पडताळणी कामी पाठविण्यात येईल. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचने प्रमाणे मी, पंच क्रमांक 1 व सापळा पथकातील सदस्य पोकॉ खदिर व पोना राठोड असे वेगवेगळ्या मोटार सायकलने लोकसेवक यांचे कार्यालयाकडे रवाना होवून लोकसेवक यांचे कार्यालयाच्या अलीकडे निर्जनस्थळी जावून थांबलो. सदर ठिकाणी सापळा पथकातील सदस्य पोकॉ खदिर यांनी माझे गळयात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून दोरीच्या साहाय्याने लटकवून दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे लोकसेवक श्री काठीकर यांची भेट घेणेकामी त्यांचे कार्यालय पाणी पुरवठा विभाग झोन क्रमांक 4 महानगर पालीका नांदेड येथे वेळ 11.53 वा रवाना झालो. लोकसेवक यांचे कार्यालयात पोहचल्यावर आम्हाला कळाले की, श्री काठीकर साहेब मिटींगकामी गेले आहेत ते सध्या कार्यालयात नाही. त्यामुळे आम्ही ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो आहे. सदर दिवशीची कार्यवाही तात्पुरती स्थगीत करून उदईक रोजी पुढील कार्यवाही करण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला.

त्यानंतर दिनांक 02/09/2023 रोजी वेळ 10.00 वा. मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे हजर आलो. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार साहेब यांनी आम्हाला लाच मागणी पडताळणी कार्यवाही कामी योग्य त्या सुचनांची उजळणी करून दिली. त्यानंतर मला लोकसेवक श्री काठीकर यांना त्यांच्या भेटीचे ठिकाण निश्चीत करण्यासाठी माझे मोबाईल क्रमांकावरून त्यांचे मोबाईल क्रमांक 9552587335 वर फोन लावण्यास सांगितले असता मी लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांक वर वेळ 11.17 वा. संपर्क केला तेव्हा लोकसेवक श्री काठीकर यांनी मला अफजल सोबत या असे सांगितले. नमुद कॉल पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचने प्रमाणे पोकॉ/खदिर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचने प्रमाणे मी व पंच क्रमांक 1 असे अफजल यांची देगलूर नाका नांदेड येथे भेट घेवून त्यांच्या सोबत श्री काठीकर यांचे कार्यालयकडे जाणेसाठी निघालो. त्यावेळी शिवाजी चौक नांदेड येथे आम्हास सापळा पथकातील सदस्य पोकॉ खदिर, पोना/राठोड यांनी भेटून पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचने प्रमाणे माझे गळयात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून दोरीच्या साहाय्याने गळयात लटकवून दिले. त्यानंतर वेळ 12.34 वा. मी व पंच क्रमांक 1 असे अफजलच्या वाहनाच्या पाठीमागे तक्रारदार यांचे मोटार सायकलने लोकसेवक श्री काठीकर यांचे कार्यालयात गेलो असता तेथे श्री अफजल यांनी मला म्हणाले की, उनो बोलरे चालीस पैतालीस लगते बोलरे उनो, आपण क्या बीस मे कर दे रे है. नही क्या है बोल दो बोलरे, नही तो पैतालीस तक लगते बोलरे असे म्हणाले. त्यानंतर मी श्री काठीकर यांचे कक्षात गेलो असता श्री काठीकर यांनी पंच क्रमांक 1 यांचे समक्ष माझे कामासंबंधाने चर्चा करून माझेकडे 20,000/- रूपयाची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी तडजोडी साठी विनंती केली असता लोकसेवक श्री काठीकर यांनी सांगितले की, मी 20,000/- रूपये घेणार त्यापेक्षा जास्तही नाही व कमीही नाही. तसेच सदरची रक्कम श्री अफजल यांचेकडे देण्यास सांगितले. त्यावेळी मी पैसे आणणे साठी अर्धा तास वेळ मागून घेवून मी व पंच क्रमांक 1 असे तिरंगा चैक नांदेड येथे सापळा पथकातील सदस्य थांबले आहेत त्या ठिकाणी त्यांचेजवळ आलो असता त्यांनी माझे गळयातील डिजीटल व्हाईस रेकॉडर ताब्यात घेवून बंद केला व त्यानंतर आम्ही सर्वजण ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे आलो.

पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुषंगाने विचारपुस केली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पोलीस उप अधिक्षक श्री पवार, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले.

मी सांगितलेली हकिकत तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण यावरून लोकसेवक श्री काठीकर यांनी माझे व माझे भावाच्या मालकीचे टिन शेडचे उभारलेल्या कामाची महानगर पालीका नांदेड यांची कोणतीही पुर्व परवानगी न घेता काम केल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारे कार्यवाही न करण्यासाठी वेगळे 20,000/- रूपयाची लाचेची मागणी करून लाच रक्कम श्री अफजल यांचेकडे देण्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी लोकसेवक श्री काठीकर व खाजगी इसम अफजल यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावायचा असल्याचे सांगुन ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे मला व दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाहीचा उद्देश सांगितला. पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचनेवरुन पोना राठोड यांनी अँथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अँल्ट्राव्हाईलेट लॅम्प माहिती सांगुन त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच खाजगी इसम अफजल यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून खाजगी इसम अफजल यांना देण्यासाठी माझेकडील 20,000/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 40 चलनी नोटा घेवुन त्यास अँथ्रासिन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशात काही एक चिज वस्तु नसल्याची खात्री करून ठेवले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचनेवरुन मी व पंच क्र. 01 श्री विक्की यन्नम असे तक्रारदार यांचे मोटार सायकलने ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून रवाना झालो. त्यानंतर आमचे पाठीमागे थोडे अंतर राखुन सापळा पथक शासकीय वाहनाने बाबा पेट्रोल पंप देगलूर नाका नांदेड येथे आले. सदर ठिकाणी मला व पंच क्रमांक 1 यांना शासकीय वाहनात बसवून वेळ 15.22 वा. खाजगी इसम श्री अफजल यांना माझे मोबाईल क्रमांक वरुन श्री अफजल यांचे मोबाईल क्रमांक 9890315520 वर फोन करणे बाबत सांगितले असता मी श्री अफजल यांना फोन केला असता श्री अफजल यांनी फोन रिसीव्ह करून सांगितले की, मी सद्या कामात आहे मला वेळ लागेल मी तुम्हाला फोन करतो असे कळविले. म्हणून आम्ही सर्व सापळा पथक असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत येवून श्री अफजल यांची फोनची वाट पाहत थांबलो.

त्यानंतर सायंकाळी पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी मला श्री अफजल यांना फोन करणे बाबत सुचना दिली तेव्हा मी वेळ 17.47 वा. ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून माझे मोबाईल क्रमाक वरून श्री अफजल यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, आपण देगलूर नाका नांदेड येथील व्हाईट हाउस जवळ भेटू या, तुम्ही या असे सांगितले. सदरचा कॉल पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचनेनुसार पोकाँ/खदिर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचने प्रमाणे मी व पंच क्रमांक 1 असे श्री अफजल यांना भेटण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलने रवाना झालो. आमचे पाठीमागे थोडे अंतर राखुन सापळा पथक शासकीय वाहनाने आमच्या पाठीमागे आले. मी व पंच क्र.1 असे बाबा पेट्रोल पंप देगलूर नाका नांदेड येथे पोहचून रस्त्याच्या कडेला थांबलो असता सदर ठिकाणी वेळ 18.08 वा. सापळा पथकातील सदस्य पोकाँ खदिर यांनी पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांचे सुचने प्रमाणे माझे गळ्यात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून दोरीच्या साहाय्याने लटकवून दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे तक्रारदार यांचे मोटार सायकलवर बसून व्हाईट हाउस समोरील सार्वजनीक रोडवर, देगलूर नाका, नांदेड येथे जावून थांबलो. त्यानंतर श्री अफजल यांना माझे मोबाईल क्रमांक वरून फोन करून व्हाईट हाउस येथे आल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी येत असले बाबत सांगितल्याने आम्ही व्हाईट हाउस समोर थांबून राहिलो. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य हे माझे नजरेच्या टप्प्यात येवून सुरक्षित ठिकाणी थांबून राहिले. त्यानंतर थोडयाच वेळात श्री अफजल हे मी थांबलो ठिकाणी त्यांची मोटार सायकल वर आले. त्यावेळी मी श्री अफजल यांना म्हणालो की, साबने एक रूपया भी कम नही करा, त्यावर श्री अफजल यांनी सांगितले की, नही नही एक रूपया भी कम होता नही बोले, त्यानंतर मी श्री अफजल यांना म्हणालो की, तुम्ही एक वेळा लोकसेवक श्री काठीकर यांना फोन करून सदर बाबत कळवा असे सांगितले. तेव्हा श्री अफजल यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक श्री काठीकर यांना फोन करून त्यांचे मोबाईलचे स्पीकर ऑन करून कळविले की, पैसे आगये मेरे पास बीस, असे म्हणाले असता त्यावर लोकसेवक श्री काठीकर यांनी सांगितले की, कभी भी दिए तो चलतांना, असे सांगून फोन कट केला. त्यानंतर मी माझेजवळ असलेले 20,000/- रूपये लाचेची रक्कम श्री अफजल यांचे समोर धरून मोजून घ्या असे म्हणालो असता त्यांनी माझेकडील रक्कम घेवून दोन्ही हातांनी मोजुन पॅन्टच्या खिशात ठेवले होते. त्यावेळी मला पोलीस उप अधिक्षक श्री पवार यांनी लाच रक्कम स्वीकारल्यानंतर दिलेल्या सुचना प्रमाणे सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने नियोजीत इशारा केला असता तात्काळ सापळा पथक आम्ही थांबलेल्या ठिकाणी हजर येवून श्री अफजल यांना त्यांचा परिचय देवून त्यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे विचारपूस करून पुढील कार्यवाही केली.

त्यानंतर खाजगी इसम श्री अफजल यांना ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे आणून त्यांचेकडे लोकसेवक श्री

काठीकर यांचेबाबत विचारपुस करून लोकसेवक श्री काठीकर यांना त्यांचे राहते घर व्यंकट गिरी निवास, बाबानगर नांदेड येथून पुढील कार्यवाहीकामी ताब्यात घेवून ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे आणले.

तरी आरोपी लोकसेवक क्रमांक 1. श्री गिरीश चिंताहरी काठीकर, वय 52 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद: लिपीक, नेमणूक स्थानीक कर संस्था व अतिरिक्त कार्यभार क्षेत्रीय कार्यालय क्रमांक 4 वजीराबाद नांदेड वाघाळा शहर महानगर पालीका, नांदेड, 2) आरोपी खाजगी इसम नामे मिर्झा अफजल बेग मिर्झा शमशोद्दीन बेग वय 54 वर्ष, व्यवसाय ट्रान्सपोर्ट (सेंटर पार्सल काम) रा. गुलजार बाग माळटेकडी रोड नांदेड यांनी माझे व माझे भावाच्या मालकीचे टिन शेडचे उभारलेल्या कामाची महानगर पालीका नांदेड यांची कोणतीही पुर्व परवानगी आम्ही न घेता काम केल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारे कार्यवाही न करण्यासाठी लोकसेवक श्री काठीकर यांनी वेगळे 20,000/- रूपयाची लाचेची मागणी केली. तसेच खाजगी इसम श्री अफजल यांनी सदर लाच रक्कम लोकसेवक श्री काठीकर यांना देण्यासाठी मला प्रवृत्त केले. लोकसेवक श्री काठीकर यांनी सदरची रक्कम खाजगी इसम श्री अफजल यांचेकडे देण्यास सांगितल्याने खाजगी इसम श्री अफजल यांनी सदरची लाचेची रक्कम सापळा कार्यावाही दरम्यान पंच क्रमांक 1 यांचे समक्ष लोकसेवक श्री काठीकर यांच्या वतीने लाच रक्कम 20,000/- रूपये स्वीकारले म्हणून वर नमुद लोकसेवक क्रमांक 1 यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्याकरीता अनूचीत गैरलाभ मिळविण्यासाठी आरोपी क्रमांक 2 यांचेद्वारे लाच रक्कम स्वीकारली आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक व खाजगी इसम यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मला वाचून दाखविला व हिंदीमध्ये समजावून सांगितली असून तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH BAPURAO TAMBE(I (Inspector)) / 151010000402SBTM82010

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.इतवारा, नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANTOSH BAPURAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402SBTM820